**प्रेसनोट दि. २५/०५/२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन, तपास पथकातील निलेश जमदाडे यांची उत्कृष्ट कामगिरी**

---

दि. २२/०५/२०१९ रोजी पोलीस उप-निरीक्षक जी.आर.सोनावणे, सहा.पो.फौजदार मोहन भुरुक, पोना ६७३९ निलेश जमदाडे, पोशि ७५२८ मयुर शिंदे, पोशि ८४८५ हरिष गायकवाड व पोशि ८६९४ निलेश कुलथे हे सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना वडगाव ब्रिजजवळ गेले असता पोना ६७३९ निलेश जमदाडे यांना त्यांचे बातमीदारामार्फत रात्रौ. २०.०० वा. चे सुमारास बातमी मिळाली की, प्रयेजा सिटीजवळ एक इसम अंगात काळसर/निळसर रंशाचा शर्ट व राखाडी रंगाची पॅन्ट घातलेला उभा असुन त्याचे कमरेला पिस्टल सारखे हत्यार दिसत आहे. त्याची हालचाल संशयास्पद दिसत आहे. सदरची बातमी पोलीस उप-निरीक्षक जी.आर.सोनावणे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक दुर्योधन पवार यांना कळवुन त्यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे पोलीस स्टाफसह प्रयेजा सिटीजवळ वडगाव येथे गेले असता त्यांना बातमीमधील वर्णनाचा इसम थांबलेला असल्याचे दिसले. तो इसम पोलीसांना पाहताच त्या ठिकाणावरुन निघुन जावु लागला असता पोलीस उप-निरीक्षक जी.आर.सोनावणे यांनी त्यांचे स्टाफचे मदतीने त्यास जागीच २०.३० वा. चे सुमारास पकडुन त्याला त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने आपले नाव अजय अरुण जाधव, वय २२ वर्षे, रा. आम्रपाली बुध्द विहार जवळ, आशा हॉटेलचे पाठीमागे, गणेश मळा, सिंहगड रोड, पुणे असा नाव व पत्ता सांगीतला. त्याचे पॅन्टचे उजवे बाजुस कमरेजवळ खोचलेले एक पिस्टल मिळुन आले व पॅन्टच्या उजव्या खिशात एक काडतुस मिळुन आले. त्याच्याकडे शस्त्र परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने त्याच्याकडे शस्त्र परवाना नसल्याचे सांगीतले.

इसम नामे अजय अरुण जाधव, वय २२ वर्षे, रा. आम्रपाली बुध्द विहार जवळ, आशा हॉटेलचे पाठीमागे, गणेश मळा, सिंहगड रोड, पुणे याने प्रयेजा सिटीजवळ वडगाव, पुणे या ठिकाणी विनापरवाना, अनाधिकाराने, बेकायदेशीररीत्या आपले ताब्यात एक गावठी बनावटीचे लोखंडी पिस्टल व एक जिवंत राऊंड बाळगले असताना मिळुन आल्याने मा. पोलीस सह आयुक्त साो. यांचे आदेशाने पुणे शहरात शस्त्र, लाठया, काठया, वापरण्यास बंदी आदेश असताना त्याचा भंग केला म्हणुन सदर इसमाचे विरुध्द आर्म ॲक्ट कलम ३,(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन त्याला दाखल गुन्हयात अटक करुन पोलीस उप-निरीक्षक जी.आर.सोनावणे, सहा.पो.फौजदार मोहन भुरुक, पोना ६७३९ निलेश जमदाडे, पोशि ७५२८ मयुर शिंदे, पोशि ८४८५ हरिष गायकवाड व पोशि ८६९४ निलेश कुलथे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.